उद्योग उपसंचालक (प्रशासन), गट-अ (वेतनस्तर एस-२०, रु.५६१००-१७७५००) या पदावर तात्पुरती पदोन्नती देणेबाबत.

# महाराष्ट्र शासन
## उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

**शासन आदेश क्रमांकः पदोन्न-२०२६/प्र.क्र.५३ /उद्योग-३**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २७ मे, २०२६

वाचा -

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७.०५.२०२१
२) उद्योग संचालनालयाचे पत्र: उसं/ आस्था/ पदो/ उउसं(प्र)/ २०२५-२६/ अे-९३, दि.२९.०१.२०२६

**शासन आदेश-**

उद्योग संचालनालयाच्या आस्थापनेवरील उद्योग उपसंचालक (प्रशासन), गट-अ (वेतनस्तर एस-२०, रु.५६१००-१७७५००) संवर्गामध्ये निव्वळ रिक्त असलेल्या तीन पदांवर उद्योग अधिकारी (प्रशासन), गट- ब संवर्गातील सेवाजेष्ठतेनुसार पात्र खालील अधिका-यांस सन २०२५-२६ या निवडसूची वर्षाकरीता तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे. तसेच त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या पदावर त्यांची पदोन्नतीने पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदोन्नतीनंतरची पदस्थापना | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री. र. मा. सुतार | उद्योग संचालनालय, मुंबई (मुख्यालय) | रिक्त पदावर |
| २ | श्रीमती स्वा. कि. लवणे | उद्योग संचालनालय, मुंबई (मुख्यालय) | रिक्त पदावर |
| ३ | श्री. र. का. शेंडे | उद्योग संचालनालय, मुंबई (मुख्यालय) | रिक्त पदावर |

२. वरील अधिकाऱ्यास पुढील अटी व शर्तींच्या अधीन राहुन तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

१) मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधीन राहून पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ स्थित सेवाज्येष्ठतेनुसार, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबत उपरोक्त क्र. १ येथील दि.०७.०५.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिलेल्या सूचनांनुसार सदर मान्यता देण्यात येत आहे. तसेच दि. ०७.०५.२०२१ रोजीच्या शासन निर्णयाप्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे आव्हान देण्यात आलेले असून त्यावरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहुन सदर सहमती देण्यात येत आहे.

२) सदर उद्योग उपसंचालक (प्रशासन), गट-अ पदावरील पदोन्नती उक्त अधिका-यांना त्यांच्याविरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी प्रलंबित अथवा प्रस्तावित नाही या धारणेच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

३) सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील व पदोन्नतीसूचीतील अधिकाऱ्यांना नियमितपणाचा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.

४) पदोन्नती कोट्यातील पदावर देण्यात येत असलेली सदर पदोन्नती तात्पुरत्या स्वरुपाची असून ती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

५) सदर निवडसूचीतील सेवाज्येष्ठतेनुसार पात्र असलेल्या तथापि पदोन्नती नाकारलेल्या अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीसंदर्भात या विभागाच्या दि.१२.०९.२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

३. उपरोक्त नमूद अधिका-यांना पदोन्नतीनंतरच्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजु होण्यासाठी या आदेशाद्वारे एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे. त्यानुसार त्यांनी पदोन्नतीच्या पदावर विहित मुदतीत रुजू व्हावे. तद्नंतर रुजू अहवाल उद्योग संचालनालयामार्फत शासनास सादर करावा. तसेच त्यांनी अनाधिकृतपणे रजेवर जाऊ नये. तसेच पदस्थापना रद्द अथवा त्यात बदल करण्यासाठी कोणत्याही स्वरुपाचे आवेदन सादर करु नये. तसे केल्यास सदर अधिकारी शिस्तभंगविषयक कारवाई करण्यास पात्र ठरतील, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

४. महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०१५ मधील २ (ड) येथील तरतुदीनुसार पदोन्नतीने नियुक्त होणाऱ्या सदर अधिकाऱ्यांनी पदोन्नतीचे आदेश निघाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या विहीत मुदतीत रूजू होणे आवश्यक राहील सदर मुदतीत रुजू न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांचा अनुपस्थितीचा कालावधी अकार्यदीन (dies non) म्हणून गणला जाईल.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०५२७१७५००१३९१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHASHANK TUKARAM CHAVAN

Digitally signed by SHASHANK TUKARAM CHAVAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=7DD1791F8C7F2D8CBABBAE6C3C11AC3D4FE93CCAB49DAF36FF24DACD585E2276, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=A089DF063F1FFA9C6E2D052DB3C26C5B1ECE40048A4A7D39615BEE66D9E2053D, cn=SHASHANK TUKARAM CHAVAN
Date: 2026.05.27 17:52:00 +05'30'

**(शशांक चव्हाण)**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

२. मा. राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव (उद्योग ) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
४. विकास आयुक्त (उद्योग) उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई ४०० ०३२.
५. महालेखापाल, (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),१,महाराष्ट्र ,मुंबई.
६. अधिदान व लेखाधिकारी अधिकारी, मुंबई.
७. संबंधित अधिकारी (द्वारा उद्योग संचालनालय,मुंबई )
८. निवडनस्ती (उद्योग-३)